आदिवासी विकास विभाग

आदिवासी जनहिताय

महाराष्ट्र शासन

# अर्थसंकल्प २०२६-२७

## ₹ २७,६८३ कोटी

समर्थन

## अर्थसंकल्प अध्ययन केंद्र


१०५ लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,

मरीन लाईन्स (पू.) मुंबई- ४०० ०२० ☎०२२-२२००३०६०

✉: samarthanmumbai97@gmail.com

www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : स्व. सदानंद वर्दे

संस्थापक : श्री. विवेक पंडित

अध्यक्ष : ॲड (डॉ.) अशोक येंडे

उपाध्यक्ष : श्री. आशिष कुलकर्णी

कार्याध्यक्ष : श्री. संतोष पाटील

सचिव : डॉ. आशिष भोसले

**संपादक : मुक्ता भारती व हिंदप्रभा कर्वे**

**विश्लेषण आणि संकलन :**

**रुपेश कीर - ९८९२९३९६१७**

**विशेष सहाय्य :**

स्नेहा घरत, विलास सुर्वे,
निलम काकड, उमेश सांगळे, प्रज्योत म्हादये व
राजेश्री कदम

**नोंदणी क्रमांक :**

**पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र. एफ - १८९०३, मुंबई**

**सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई १५६७/९६ जीबीबीएसडी**

**प्रकाशक (प्रत्रव्यवहार):**


१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई - ४०० ०२०

Email : samarthanmumbai97@gmail.com
**website :** www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरीता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन' राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी देणे.
- प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे...

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपण्याचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१८-१९ पासून २०२४-२५ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२५-२६ सुधारित अंदाज तसेच २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्या ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्य.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागावर टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिध्द करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन :

रुपेश कीर - ९८९२९३९६१७

मार्गदर्शक - विवेक पंडित

संस्थापक, समर्थन

# आदिवासी विकास विभाग

## ठळक वैशिष्ट्ये

### राज्याच्या अर्थसंकल्पात आदिवासी विकास विभागाचा वाटा नगण्य:

- राज्यात वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार २१३ (९.४%) इतकी असून वर्ष २०२६-२७ च्या एकूण अर्थसंकल्पात आदिवासी विकास विभागाचा वाटा केवळ ३.३१ टक्के इतका आहे.
- सन २०२६-२७ मध्ये आदिवासी विकास विभागाचा अर्थसंकल्प २७ हजार ६८३ कोटी आहे.
- सन २०१८-१९ ते २०२४-२५ या कालावधीत आदिवासी विकास विभासाठी ९७ हजार १९७ कोटी अंदाजित करण्यात आले, मात्र प्रत्यक्षात खर्च ७९ हजार २८ कोटी खर्च करण्यात आले. याचाच अर्थ १८ हजार १६९ कोटींच्या खर्चाला कात्री लावण्यात आली.
- आदिवासी क्षेत्रातील बेरोजगारी, कुपोषण व दारिद्र्य वाढण्यामागे शासनाची उदासीनता दिसून येते. सातत्याने अर्थसंकल्पित केलेल्या निधी पेक्षा कमी निधी उपलब्ध होत असल्याने दिसते.

### आदिवासी घटक कार्यक्रम घोषणा मोठी; प्रत्यक्ष खर्च मात्र कमी:

- सन २०१८-१९ ते २०२४-२५ या ७ वर्षाच्या कालावधीत आदिवासी उपयोजनेचा अनुशेष ६१ हजार १११ कोटी रुपये.
- सन २०१८-१९ ते २०२४-२५ या ७ वर्षाच्या कालावधीत आदिवासी उपयोजनेच्या प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण राज्य योजनेच्या तुलनेत ९.४ टक्के अपेक्षित असताना केवळ ३.८८ टक्केच निधी उपलब्ध झालेला आहे.


### आदिवासी भागात वैद्यकीय क्षेत्रातील रिक्त पदांचे प्रमाण २४ टक्के

- आदिवासी भागातील वैद्यकीय क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या नवसंजीवनी योजनेतील १ हजार ६२१ पदे रिक्त.
- वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ व ३ तसेच भरारी पथका तील मानवसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण मंजूर १ हजार १२० पदांपैकी १ हजार २३ पदे भरलेली असून ९७ (८.६६%) पदे रिक्त आहेत.
- बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी स्त्री व पुरुष यांच्या मंजूर ४ हजार ६०९ पदांपैकी १ हजार ४२७ पदे रिक्त असून त्याचे प्रमाण ३०.९६ टक्के इतके आहे.

# ७ वर्षांत १८ हजार १६९ कोटींच्या खर्चाला कात्री !

## विभागाचा मागील ७ वर्षात सरासरी वार्षिक खर्च केवळ ११ हजार २८९ कोटी रुपये!

आलेख क्र. १




| | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ११२२१ | १०६६७ | ११५५८ | १२७७९ | १४९५० | १७३३३ | १८६८९ | २७८६१ | २७६८३ |
| सुधारित अंदाज | १०७५७ | ९६७२ | १०९६६ | १२७८३ | १५२७३ | २०१२९ | २०८२१ | २५९२५ | |
| प्रत्यक्ष खर्च | ८६१६ | ७९०० | ८७१८ | ८७२५ | १२८०८ | १५३२८ | १६९३३ | | |

*(स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्त विषयक विवरण पत्र (टीप: वर्ष २०२४-२५ चे प्रत्यक्ष, वर्ष २०२५-२६ चे सुधारित अंदाज व २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **सन २०२६-२७ मध्ये आदिवासी विकास विभागाचा अर्थसंकल्प २७ हजार ६८१ कोटी आहे.**
- **राज्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी असून वर्ष २०२४-२५ मध्ये राज्याच्या एकूण अर्थसंकल्पात विभागाचा वाटा केवळ २.६१ टक्के इतका आहे.**
- **सन २०१८-१९ ते २०२४-२५ या कालावधीत आदिवासी विकास विभासाठी ९७ हजार १९७ कोटी अंदाजित करण्यात आले, मात्र प्रत्यक्षात ७९ हजार २८ कोटी खर्च करण्यात आले, याचाच अर्थ १८ हजार १६९ कोटींच्या खर्चाला कात्री लावण्यात आली.**
- **सन २०२४-२५ मध्ये विभागाने सुधारित अंदाज २० हजार ८२१ कोटी रुपये इतका केला होता, मात्र प्रत्यक्षात १६ हजार ९३३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून ३ हजार ८८८ कोटी रुपयांची कपात झाली.**
- **आदिवासी क्षेत्रातील बेरोजगारी, कपोषण व दारिद्र्य वाढण्यामागे शासनाची उदासीनता दिसून येते. सातत्याने अर्थसंकल्पीत केलेल्या रकमेपेक्षा कमी निधी उपलब्ध होत असल्याने दिसते.**

# सन २०१८-१९ ते २०२४-२५ या ७ वर्षाच्या कालावधीत आदिवासी उपयोजनेचा अनुशेष १६ हजार ४०७ कोटी!

**प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण राज्य योजनेच्या तुलनेत ९.४ टक्के अपेक्षित असताना केवळ ३.८८ टक्केच !**

तक्ता क्र. १ रु. कोटीत

| सन | राज्य योजना | आदिवासी उपयोजना | प्रत्यक्ष खर्च | प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण (%) | अनुशेष (३-४) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| २०१८-१९ | ९५,००० | ८,९६९ | ७,२७४ | ७.६६ | १,६९५ |
| २०१९-२० | ९९,००० | ८,५३१ | ६,८३३ | ६.९० | १,६९८ |
| २०२०-२१ | १,००,८०० | ८,८५३ | ७,४१५ | ७.३६ | १,४३८ |
| २०२१-२२ | २,१२,०३४ | १०,३४५ | ७,७३५ | ३.६४ | २,६१० |
| २०२२-२३ | १,५०,००० | १२,५६३ | ३,७२४ | २.४८ | ८,८३९ |
| २०२३-२४ | १,७२,००० | १२,६५५ | १३,४८५ | ७.८४ | -८३० |
| २०२४-२५ | २,१७,६१९ | १५,३६० | १४,४०३ | ६.६१ | ९५७ |
| २०२५-२६ | २,५४,५६० | २२,९८१ | - | - | - |
| २०२६-२७ | २,६७,०२६ | २१,७२३ | - | - | - |
| **एकूण** | **१५,६८,०३९** | **१,२१,९८०** | **६०,८६९** | **३.८८** | **१६,४०७** |

*(**स्रोत:** वार्षिक कार्यक्रम, नियोजन विभाग संक्षिप्त व विभागवार, टीप: वर्ष २०२४-२५ चे प्रत्यक्ष, वर्ष २०२५-२६ चे सुधारित अंदाज व २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*


- **सन २०१८-१९ ते २०२४-२५ या ७ वर्षाच्या कालावधीत आदिवासी उपयोजनेचा अनुशेष १६ हजार ४०७ कोटी रुपये.**
- **सन २०१८-१९ ते २०२४-२५ या ७ वर्षाच्या कालावधीत आदिवासी उपयोजनेच्या प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण राज्य योजनेच्या तुलनेत ९.४ टक्के अपेक्षित असताना केवळ ३.८८ टक्केच निधी उपलब्ध झालेला आहे.**
- **सन २०२२-२३ या कालावधीत १ लाख ५० हजार कोटी रुपयांची राज्य योजना होती, या कालावधीत १२ हजार ५६३ कोटींची आदिवासी उपयोजना मंजूर करण्यात आली, मात्र या कालावधीत प्रत्यक्ष खर्च ३ हजार ७२४ कोटी रुपये झाला; याचाच अर्थ ८ हजार ८३९ कोटी रुपये कमी खर्च करण्यात आले असून खर्चाचे प्रमाण केवळ २.४८ टक्क्यांवर आले.**

- सन २०२४-२५ या कालावधीत राज्य योजना २ लाख १७ हजार ६१९ कोटी रुपयांची होती, त्या तुलनेत १५ हजार ३६० कोटी रुपये आदिवासी उपयोजनेसाठी अंदाजित केले गेले होते. त्या तुलनेत १४ हजार ४०३ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे. खर्चाचे ही प्रमाण ६.६१ टक्के इतके आहे.
- सन २०१८-१९ ते २०२४-२५ या ७ वर्षाच्या कालावधीत एकूण १५ लाख ६८ हजार ३९ कोटी रुपये राज्य योजनेसाठी अंदाजित करण्यात आले होते, या योजनेच्या अनुषंगाने राज्यातील आदिवासींच्या लोकसंख्येच्या तुलनेत ९.४ टक्के नियतव्यय देणे गरजचे होते, त्यानुसार हा खर्च १ लाख ४७ हजार ३९५ कोटी ६६ लाख रुपये होणे गरजेचे होते. मात्र त्यापैकी आदिवासी उपयोजनेसाठी १ लाख २१ हजार ९८० कोटी रुपये अंदाजित करण्यात आले असून त्याचे राज्य योजनेसाठी प्रमाण ७.७७ टक्के इतके झाले आहे, तर प्रत्यक्ष खर्च ६० हजार ८६९ कोटी रुपये झाला असून त्याचे प्रमाण ३.८८ टक्के इतके कमी राहिले आहे.

## मुंबई व नंदुरबार या जिल्ह्यातील आर्थिक दरी वाढली !

### राज्यातील जिल्ह्यांचा होतोय; असमतोल विकास

आलेख क्र. २:




*(**स्त्रोत:** आर्थिक पाहणी २०२५-२६)*

- सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेले तीन जिल्हे नंदुरबार (रु.१,४६,८०७), गडचिरोली (रु.१,५६,६०६), वाशिम (रु.१,६०,९२५) असून पुणे (रु.४,२६,७२०), ठाणे (रु.४,४४,२८३) व  मुंबई चे दरडोई उत्पन्न सर्वाधिक (रु.५,१७,८७५) इतके आहे.
- मुंबईचे दारडोई उत्पन्न ५ लाख १७ हजार ८७५ रुपये इतके असताना त्याच वेळी नंदुरबार जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न १ लाख ४६ हजार ८०७ रुपये इतके आहे. दोन्ही जिल्ह्यांमधील दरडोई उत्पन्नातील फरक ३ लाख ७१ हजार ६८ रुपये एवढे मोठे आहे.
- मुंबई, ठाणे व पुणे यासारख्या महानगराचे दरडोई उत्पन्न आणि ग्रामीण दुर्गम जिल्ह्यांचे उत्पन्न हे विषमतेची प्रचंड दरी दाखविते.

## नामांकित इंग्रजी शाळांमध्ये सन २०२३-२४ च्या तुलनेत
## २०२५-२६ मध्ये; ९ हजार २०१ विद्यार्थी घटले !

तक्ता: क्र. २

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | घट (२-४) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | ४६,८५२ | ४४,३५७ | ३७,६५१ | -९,२०१ |
| खर्च (रु.कोटी) | २९९.९८ | ४३८.४३ | ९२.५३ | -२०७.४५ |

*(स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६)*

- सन २०२३-२४ मध्ये नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या ४६ हजार ८५२ होती. त्यात सन २०२४-२५ मध्ये २ हजार ४९५ विद्यार्थ्यांची घट होऊन ४४ हजार ३५७ एवढी झाली. तर सन २०२५-२६ मध्ये आणखी ९ हजार हजार २०१ विद्यार्थ्यांची घट झाली.
- सन २०२३-२४ मध्ये नामांकित इंग्रजी माध्यमांच्या आदिवासी विद्यार्थ्यांवर २९९ कोटी ९८ लाख रुपये निधी खर्च झाला; तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर २०२५ पर्यंत ३७ हजार ६५१ विद्यार्थ्यांवर फक्त ९२ कोटी ५३ लाख रुपये निधी खर्च करण्यात आला.

# सन २०२५-२६ मध्ये वसतिगृहात आदिवासी विद्यार्थी वाढले; खर्च मात्र कमी झाला !

तक्ता: क्र. ३

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|
| वसतिगृह (संख्या) | ४९० | ४९० | ४९० |
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | ५४,७०८ | ५५,८६५ | ५७,४७४ |
| खर्च (रु.कोटी) | २३०.४४ | २३७.३६ | १५४.९७ |

*(स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६,डिसेंबर २०२५ अखेर)*

- **सन २०२३-२४ पासून २०२५-२६ पर्यंत राज्यात ४९० वसति गृहे आहेत, मागील ३ वर्षांत राज्यात एकही नवीन आदिवासी वसतिगृह बांधले गेलेले नाही.**
- **सन २०२४-२५ मध्ये वसतिगृहांची लाभार्थी विद्यार्थी संख्या ५५ हजार ८६५ होती त्यात सन २०२५-२६ मध्ये त्यात १ हजार ६०९ विद्यार्थ्यांची वाढ होऊन ती संख्या ५७ हजार ४७४ एवढी झाली आहे.**
- **सन २०२३-२४ मध्ये २३० कोटी ४४ लाख रुपये खर्च झाले तर वर्ष २०२५-२६ मध्ये ७५ कोटी ४७ लाख रुपयांची खर्चात घट होऊन आतापर्यंत फक्त १५४ कोटी ९७ लाख रुपयेच खर्च झाले आहेत.**
- **सन २०२३-२४ मध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांमागे ४२ हजार २२१ रुपये खर्च करण्यात आला.**
- **सन २०२४-२५ मध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांमागे ४२ हजार ४८८ रुपये खर्च करण्यात आला.**
- **सन २०२५-२६ मध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांमागे २६ हजार १६२ रुपये खर्च करण्यात आला.**
- **खर्चात सरासरी १६ हजार रुपयांची घट झाली.**

# शबरी आदिवासी घरकुल योजना,

## आजही ६१ हजार १८६ लाभार्थी घरकुलच्या प्रतीक्षेत !

तक्ता: क्र. ३

| शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) ची प्रगती | | | |
|---|---|---|---|
| **वर्ष** | **लक्ष्य** | **मंजूर** | **खर्च(रु.कोटी)** |
| २०२२-२३ | ९३,२८८ | ८२,५४५ | २००.०४ |
| २०२३-२४ | १,२१,१२५ | ७७,९६८ | ५८१.९२ |
| २०२४-२५ | ८,७१३ | १,७१३ | ६३०.५१ |
| **एकूण** | **२,२३,१२६** | **१,६२,२२६** | **१,४१२.४७** |

*(स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२४-२५)*

- **सन २०२१-२२ ते २०२४-२५ या ३ वर्षे १० महिन्यांत राज्य शासनाचे २ लाख ४१ हजार ६७० शबरी घरकुलांचे लक्ष्य होते, मात्र त्यापैकी १ लाख ८० हजार ४८४ घरकुलेच मंजूर झाली असून ६१ हजार १८६ (२५.५६%) घरकुलांना मंजूरी मिळाली नाही.**
- **सन २०२२-२३ मध्ये शासनाचे ९३ हजार २८८ घरकुलाचे लक्ष्य होते मात्र त्यापैकी फक्त ८२ हजार ५४५ घरकुलांना मंजूरी मिळाली असून १० हजार ७४३ (११.१५%) लाभार्थी आजही घरकुलांच्या प्रतीक्षेत आहेत.**
- **सन २०२३-२४ मध्ये १ लाख २१ हजार १२५ घरकुलांचे लक्ष्य असताना केवळ ७७ हजार ९६८ घरकुले मंजूर झाली तर ४३ हजार १५७ ( ३५.६३%) घरकुलांना मंजुरी मिळालेली नव्हती.**
- **सन २०२४-२५ मध्ये ८ हजार ७१३ घरकुलांपैकी डिसेंबर पर्यंत केवळ १ हजार ७१३ घरकुलांनाच मंजूरी मिळालेली आहे.**

**टीप :-**

- **आर्थिक पाहणी २०२५-२६ मध्ये शबरी घरकूल योजनेची प्रत्यक्ष स्थिती दिली नसल्याने वरील तक्त्यामधील वर्ष २०२४-२५ ची माहिती डिसेंबर २०२४ पर्यंतची आहे.**
- **तसेच वर्ष २०२५-२६ मध्ये शबरी घरकूलांचे लक्ष दिले नसल्याने किती घरकूल एका वर्षात पूर्ण करावयाचे होते याचा अंदाज येत नाही.**
- **वर्ष २०२५-२६ मध्ये मंजूर घरांची संख्या २,८४,७०१ त्यापैकी पूर्ण घरकुलांची संख्या १,९९,०८९ त्यावर झालेला खर्च २,७४४.३९ (कोटी)**

## वर्ष २०२५-२६ साठीचा आदिवासी घटक कार्यक्रमासाठी असलेला

## १२ हजार २५५ कोटी २० लाखाचा निधी अखर्चित !

तक्ता: क्र. ३

| क्षेत्र | २०२३-२४ | | | २०२४-२५ | | | २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित खर्च | प्रत्यक्ष खर्च | प्रमाण | प्रस्तावित खर्च | प्रत्यक्ष खर्च | प्रमाण | प्रस्तावित खर्च | प्रत्यक्ष खर्च | प्रमाण |
| अ) राज्य योजना | **१२,९५०.१४** | **११,७१५.८१** | **९०.४६** | **१२,९९६.७३** | **१२,०८२.३९** | **९२.९६** | **१८,७६०.३१** | **८,७६८.६९** | **४६.७४** |
| **कृषि व संलग्न कार्य** | १५८.३३ | ६४.३३ | ४०.६३ | १२५.१७ | ६५.३६ | ५२.२१ | १२९.९६ | ४५.२३ | ३४.८० |
| **ग्राम विकास** | २३७.२० | १३०.८१ | ५५.१४ | ३५२.०० | ७७१.१२ | २१९.०६ | २,४७९.९२ | १,०१२.२६ | ४०.८१ |
| **पाठबंदारे व पूर नियंत्रण** | ००.०० | ००.०० | ००.०० | ००.०० | ०.२९ | - | ०.२९ | ००.०० | ०.० |
| **ऊर्जा** | २५५.१७ | २५५.१७ | १००.०० | २२१.०० | ७७५.९९ | ३५१.१२ | १,५८०.०० | ६१९.२५ | ३९.१९ |
| **उद्योग व खनिजे** | ८.१४ | ८.१४ | १००.०० | ५.०० | ३.५० | ७० | ४.०० | ००.०० | ०.० |
| **वाहतूक-दळणवळण** | १,८५२.५४ | १,८४८.७१ | ९९.७९ | २,३१०.०० | १,३४७.६९ | ५८.३४ | ६००.०० | ००.०० | ०.० |
| **सामाजिक सेवा** | १०,४३८.७६ | ९,४०८.६५ | ९०.१३ | ९,९८३.५६ | ९,११८.४४ | ९१.३३ | १३,९६६.१४ | ७,०९१.९५ | ५०.७७ |
| ब) जिल्हा योजना | **२,१५८.७८** | **२,१४९.३८** | **९९.५६** | **२,३६३.२७** | **२,३५३.९४** | **९९.६०** | **२,७३४.६९** | **४७१.११** | **१७.२२** |
| **कृषि व संलग्न कार्य** | ३५०.४३ | ३५९.३५ | १०२.५४ | ४००.०५ | ४५७.४२ | ११४.३४ | ५५०.६८ | ७५.२० | १३.६५ |
| **ग्राम विकास** | २७९.०० | २८१.६६ | १००.९५ | २७८.६४ | २७३.९५ | ९८.३१ | २७१.२६ | ११३.१२ | ४१.७० |
| **ऊर्जा** | १३२.५४ | १३५.९९ | १०२.६० | १४७.४६ | १४६.६६ | ९९.४५ | १६६.३४ | १४.९२ | ८.९६ |
| **उद्योग व खनिजे** | १.१४ | १.०९ | ९५.६१ | १.१७ | १.०७ | ९१.४५ | १.१९ | १.५० | १२६.०५ |
| **वाहतूक-दळणवळण** | २१६.५१ | २०६.२९ | ९५.२७ | २३३.८४ | २३१.५० | ९८.९९ | २८१.८१ | ४१.७७ | १४.८२ |
| **सामाजिक सेवा** | १,१७९.१६ | १,१६४.९९ | ९८.७९ | १,३०२.१२ | १,२४०.३४ | ९५.२५ | १,४५५.४१ | २२४.६० | १५.४३ |
| एकूण (अ+ब) | **१५,१०८.९२** | **१३,८६५.१९** | **९१.७६** | **१५,३६०.००** | **१४,४३६.३३** | **९३.९८** | **२१,४९५.००** | **९,२३९.८०** | **४२.९८** |

*(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०२५-२६, टीप :- सन २०२५-२६ चा खर्च ३१ डसिंबर २०२५ पर्येत)*

- **वर्ष २०२५-२६ मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमासाठी रु. २१ हजार ४९५ कोटींचा प्रस्तावित निधी उपलब्ध करून दिला असून त्यापैकी १ एप्रिल २०२५ ते ३१ डसिंबर २०२५ या ९ महिन्यांच्या कालावधीत केवळ ९ हजार २३९ कोटी ८० लाखाचा निधी खर्च करण्यात आला आहे. खर्चाचे हे प्रमाण केवळ (४२.९८%) असून, अखर्चित निधी १२ हजार २५५ कोटी २० लाख (५७.०१%) इतका आहे.**
- **वर्ष २०२४-२५ मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमासाठी रु. १५ हजार ३६० कोटी प्रस्तावित निधी उपलब्ध करून दिला असून ,त्यापैकी १४ हजार ४३६ कोटी ३३ लाख (९३.९८%) निधी खर्च केला असून रु. ९२३ कोटी ६७ लाख (६.०१%) निधी अखर्चित राहिला.**
- **वर्ष २०२३-२४ मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमासाठी रु.१५ हजार १०८ कोटी ९२ लाख निधी प्रस्तावित केला होता, त्यापैकी रु. १३ हजार ८६५ कोटी १९ लाख (९१.७६%) खर्च झाला असून रु. १ हजार २४३ कोटी ७३ लाख (८.२३%) निधी अखर्चित राहिला.**
- **राज्य योजनेतील पाठ बंदारे व पूरनियंत्रण आणि वाहतूक दळणवळण या कार्यक्रमांसाठी प्रास्ताविक खर्चापैकी डिसेंबर २०२५ पर्यंत एक रूपया खर्च केला नाही.**

# आदिवासी भागात वैद्यकीय क्षेत्रातील रिक्त पदांचे प्रमाण २४ टक्के इतके मोठे

## नवसंजीवनी क्षेत्रातील संवर्गनिहाय रिक्तपदांची स्थिती

*तक्ता क्र. ४*

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | रिक्त पदाचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी वर्ग -२ व ३ | ८४० | ७५८ | ८२ | ७.७६ |
| भरारी पथकातील मानसेवी वै. अधिकारी | २८० | २६५ | १५ | ५.३६ |
| आरोग्य सहाय्यक पुरुष | ६३२ | ५८९ | ४३ | ६.८० |
| आरोग्य सहाय्यक स्त्री | ४३५ | ३८१ | ५४ | १२.४१ |
| बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी पुरुष | १८२५ | १४५७ | ३६८ | २०.१६ |
| बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी स्त्री | २७८४ | १७२५ | १०५९ | ३८.०३ |
| **एकूण** | **६७९६** | **५१७५** | **१६२१** | **२३.८५** |

*(स्रोत : आरोग्य सेवा आयुक्तालय अहवाल भाग-१ व भाग-२ फेब्रवारी २०२६)*

- **राज्यातील आदिवासी क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या नवसंजीवनी योजनेतंर्गत आरोग्य विभागाच्या एकूण ६ हजार ७९६ मंजूर पदांपैकी ५ हजार १७५ (७७.०५%) पदे भरलेली असून १ हजार ६२१ पदे रिक्त आहेत, त्याच प्रमाणे (२३.८५%) ऐवढे आहे.**
- **वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ व ३ तसेच भरारी पथकातील मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण मंजूर १ हजार १२० पदांपैकी १ हजार २३ पदे भरलेली असून ९७ पदे रिक्त आहेत.**

# आदिवासी भागात ८ वर्षांत १० हजार ७५४ बालमृत्यू

## नवसंजीवनी योजनेअंतर्गत बालमृत्यूची माहिती

*तक्ता क्र.६*

| वर्ष | ० ते १ वयोगट | ० ते ६ वयोगट | एकूण |
|---|---|---|---|
| २०१८-१९ | १५८८ | ४१८ | २००६ |
| २०१९-२० | १३०४ | ४११ | १७१५ |
| २०२०-२१ | ११०५ | ३४८ | १४५३ |
| २०२१-२२ | ११०५ | ३५९ | १४६४ |
| २०२२-२३ | १०३२ | ३१९ | १३५१ |
| २०२३-२४ | ८५५ | २५७ | १११२ |
| २०२४-२५ | ६१६ | ३७० | ९८६ |
| २०२५-२६ (माहे डिसेंबर २०२५ अखेर) | ४८३ | १८४ | ६६७ |
| एकूण | ८०८८ | २६६६ | १०७५४ |

*(स्रोत : आरोग्य सेवा आयुक्तालय अहवाल भाग-१ व भाग-२ फेब्रवारी २०२६)*

✍ वर्ष २०१८-१९ ते २०२५-२६ या ८ वर्षांत आदिवासी भागात ० ते ६ वर्ष वयोगटातील एकूण १० हजार ७५४ बालमृत्यू झाले.

✍ वर्ष २०२५-२६ मध्ये डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत ६६७ बालमृत्यू झाल्याची नोंद आहे.

## नवसंजीवनी क्षेत्रातील मातामृत्यू

## आदिवासी भागात वर्ष २०२४-२५ मध्ये ८२ मातामृत्यू

*तक्ता क्र. ५*

| जिल्हा | २०२३-२४ मधील एकूण माता मृत्यू | २०२४-२५ मधील एकूण माता मृत्यू | २०२५-२६ मधील एकूण माता मृत्यू (माहे डिसेंबर २०२५ अखेर) |
|---|---|---|---|
| ठाणे | ० | ५ | ३ |
| पालघर | १२ | १३ | ७ |
| रायगड | ० | ० | ० |
| पुणे | ३ | २ | ० |
| नाशिक | ६ | ७ | ४ |
| अहिल्यानगर | १ | ० | १ |
| धुळे | २ | ३ | ० |
| जळगाव | ० | १ | ० |
| नंदुरबार | २३ | ३१ | १५ |
| अमरावती | ५ | ४ | ४ |
| यवतमाळ | ६ | २ | ० |
| नांदेड | ० | ३ | ० |
| गोंदिया | २ | ० | १ |
| गडचिरोली | १ | ३ | १ |
| नागपूर | ० | ० | ० |
| चंद्रपूर | ० | ८ | १ |
| **एकूण** | **६१** | **८२** | **३७** |

*(स्रोत : आरोग्य सेवा आयुक्तालय अहवाल भाग-१ व भाग-२ फेब्रवारी २०२६)*

✍ वर्ष २०२३-२४ मध्ये आदिवासी क्षेत्रात एकूण ६१ मातामृत्यू झाले असून, वर्ष २०२४-२५ मध्ये त्यात २१ मातामृत्यूची वाढ होऊन ८२ मातामृत्यू झाले होते.

✍ वर्ष २०२५-२६ मध्ये डिसेंबर २०२५ अखरे पर्यंत मातामृत्यूचे संख्या ३७ होती.